भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या रजा / रजा सवलत मंजूर करण्याबाबत सुधारित कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. आयएफएस २०११/ प्र.क्र.१६९/ फ-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक - २७ फेब्रुवारी, २०१८

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय , महसूल व वन विभाग, क्र. आयएफएस-२०११/प्र.क.१६९/फ-७ दिनांक ९.८.२०११
२) शासन निर्णय , महसूल व वन विभाग, क्र. आयएफएस-२०११/प्र.क.१६९/फ-७ दिनांक २४.११.२०१६

<u>प्रस्तावना :</u>

भारतीय वन सेवेतील अधिकाऱ्यांच्या रजा/रजा सवलत मंजूर करण्याबाबत उक्त संदर्भाधीन शासन निर्णय दि.९.८.२०११ व दि. २४.११.२०१६ अन्वये कार्यपध्दती लागू करण्यात आली आहे. त्यानुसार वन विभागामध्ये कार्यरत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रेणी पर्यंतच्या सर्व भा.व.से. अधिकाऱ्यांना अध्ययन रजा व पदस्थापनेनंतरच्या रजा वगळून अन्य सर्व प्रकारच्या रजा आणि रजा प्रवास सवलत मंजूर करण्याचे अधिकार प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांना प्रदान करण्यात आले आहेत. यामुळे क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी रजेवर गेल्याची बाब शासनास उशीराने अवगत होते. तसेच रजेवरील अधिकाऱ्यांचा पदभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविल्यामुळे अतिरिक्त कार्यभार सोपविलेल्या अधिकाऱ्यांकडून शासनास आवश्यक असलेली माहिती विहित कालावधीमध्ये प्राप्त करुन घेणे शक्य होत नाही. परिणामस्वरुप शासन स्तरावरुन होणाऱ्या निर्णयांच्या अंमलबजावणीची गतिमानता राखणे शक्य होत नाही. प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता व समन्वय साधणे शक्य व्हावे यास्तव उक्त शासन निर्णयातील कार्यपध्दतीमध्ये बदल करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :

क्षेत्रीय स्तरावरील मुख्य वनसंरक्षक व त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या १५ दिवस वा त्या पेक्षा अधिक कालावधी बाबतचे रजेचे प्रस्ताव मंजूरीस्तव शासनास सादर करण्यात याव्यात. अशाप्रकारे रजेचे प्रस्ताव शासनास सादर करताना अधिकाऱ्यांच्या रजेच्या मंजुरीच्या अनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांनी आपले अभिप्राय सादर

करावेत.त्याचप्रमाणे विधानमंडळाच्या अधिवेशन कालावधीमध्ये विधानमंडळाच्या कामकाजात व्यत्यय येऊ नये याकरिता क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कोणत्याही रजा मंजूर करण्यात येवू नयेत. अपवादात्मक परिस्थितीमध्ये प्राप्त झालेले रजेचे प्रस्ताव मंजूरीस्तव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) यांनी शिफारशींसह शासनास सादर करावेत. सदर आदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२. उपरोक्त सूचनांव्यतिरिक्त संदर्भाधीन शासन निर्णयातील इतर सूचना पूर्वीप्रमाणे लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२२७१६४७४४६११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.03.01 12:41:14 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)

मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय), महसूल व वन विभाग

प्रत :

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
४. मुख्य सचिव यांचे सह सचिव
५. सचिव (वने) यांचे स्वीय सहायक
६. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
७. सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक
८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादीत, नागपूर
९. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१०.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११.सहायक संचालक भावसे-लेखा, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.निवड नस्ती.